# मुकुल माधव फाऊंडेशनच्या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रत्नागिरी:** मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यावतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या आरोग्य शिबीराचे मुख्यकार्यकारी अधिकारी सौ.प्रेरणा देशभ्रतार यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले.

या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी जयश्री गायकवाड, एमआयडीसीच्या अभियंता सौ.नागवेकर, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संचालक संजय मठ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुध्द आठल्ये आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यावतीने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत काम पाहणाऱ्या मुकुल माधव फाऊंडेशनच्या पुढाकाराने रत्नागिरी येथे महिलांसाठी १३ दिवसांचे आरोग्य तपासणी शिबीर सुरु करण्यात आले आहे. शहरातील परकार रुग्णालयात हे शिबीर दि.१९ मार्चपर्यंत सुरु राहणार आहे.

या शिबीरामध्ये सवलतीच्या दरात मॅमोग्राफी आणि कॉल्पोस्कोप चाचणी करुन देण्यात येणार आहे. मॅमोग्राफी ही विशेष वैद्यकीय पध्दती आहे. त्यात कमी तीव्रतेने एक्स-रे वापरले जातात. त्यामुळे महिलांमधील स्तनाचा कर्करोगासारख्या आजारांचे लवकर निदान होते आणि आजार टाळणे व यशस्वीपणे बरा करण्यास मदत होते.

या शिबीरामध्ये मॅमोग्राफी व कॉल्पोस्कोप या दोन्ही तपासण्या प्रत्येकी २०० रुपयात करुन दिल्या जाणार आहे. एमएमएफ आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी यापूर्वी आयोजित केलेल्या मार्च महिन्यातील शिबीरात २०० महिलांची, तर सप्टेंबर महिन्यातील शिबारात ५०० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. फिनोलेक्स वुमन्स वेल-बीईंग क्लिनिक रत्नागिरी येथे २०१४साली सुरुवात करण्यात आले.

कोकणातील विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील महिलांमध्ये स्तनाचा कॅन्सर आणि गर्भाशय मुखाचा कॅन्सर याबाबत जनजागृती निर्माण करणे हा या शिबीराचा प्रमुख उद्देश आहे. कॅन्सरच्या लक्षणांची माहिती मिळाल्यास उपचार करुन आजार बरा होणे शक्य होते असे फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे सीएसआर समन्वयक डॉ.आशुतोष मुळ्ये यांनी सांगितले.

यासाठी लागणारी रेडिओग्राफी डायग्नोस्टिक सेवा ऑन्को-सर्जिकल सेवा पुण्मातील प्रशांती कॅन्सर केअर मिशनचे डॉ.सी.पी.कोप्पीकर यांनी उपलब्ध करुन दिली आहे.